सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!
# ग्लोबल महातेज
१ स्वागत मूल्य रु.
https://epaper.globalmahatej.com/
वर्ष १ ले | अंक : १०४ | रविवार, दि. ४ जानेवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## आजचे अभीष्टचिंतन



**श्री. राकेश मुंदडा**
प्रगतीशील शेतकरी, अमळनेर



**श्री. हर्षल चौधरी**
शिक्षक, अमळनेर

## दिनविशेष
४ जानेवारी

- लोकमान्य टिळकांनी पुण्यात केसरी वृत्तपत्र सुरू केले.
- मेहरचंद महाजन यांनी भारताचे तिसरे सरन्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारला.
- १९५३ मध्ये एव्हरेस्टवर यशस्वी चढाई करणारे सर एडमंड हिलरी दक्षिण ध्रुवावर पोहोचले.
- साहित्यिक चंद्रकांत खोत यांच्या बिंब प्रतिबिंब या कादंबरीला कोलकता येथील भारतीय भाषा परिषदेचा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाला.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**

## खानदेश शिक्षण मंडळाची निवडणूक
# प्रताप महाविद्यालयात आज मतदान
## दहा बूथवर ७० कर्मचाऱ्यांची नियुक्ती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील खानदेश शिक्षण मंडळाच्या त्रैवार्षिक निवडणुकीसाठी रविवार, दि. ४ जानेवारी रोजी प्रताप महाविद्यालयात मतदान होणार आहे. सकाळी ८ वाजेपासून सायंकाळी ५ वाजेपर्यंत मतदानाची प्रक्रिया पार पडणार आहे. एकूण ५ हजार ४९२ मतदार मतदानाचा हक्क बजावतील. १० बूथवर मतदान होईल. यासाठी ७० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विविध पदांच्या बारा जागांसाठी २९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

मतदानास येणाऱ्या सभासदाने ओळखपत्र (मूळ आधार कार्ड व एक प्रत झेरॉक्स) सोबत आणावे. ज्या सभासदांनी फोटो, आधार कार्डची झेरॉक्ससह अर्ज संस्थेच्या कार्यालयात जमा केलेले नाही, अशा सभासदांनी एक पासपोर्ट साईझ फोटो सोबत आणणे अनिवार्य राहील. ओळखीसाठी शासन मान्यताप्राप्त ओळखपत्र (आधार कार्ड, मतदान कार्ड, पॅन कार्ड आदी) आणावे.

अध्यक्षपदासाठी १, विश्वस्तपदासाठी १, उपाध्यक्षपदासाठी २ मते देण्याचा अधिकार आहे. त्यापेक्षा जास्त मते दिल्यास मतपत्रिका बाद होईल. तसेच कार्यकारी मंडळ सदस्यपदासाठी ८ मते देण्याचा अधिकार आहे. त्यापेक्षा अधिक मते दिल्यास मतपत्रिका बाद होईल. मतदान प्रक्रियेत गैरप्रकार आढळल्यास पोलिसांच्या स्वाधीन करण्यात येईल, अशी माहिती मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी पंडित चौधरी व खा. शि. मंडळाचे चिटणीस प्रा. पराग पाटील यांनी दिली आहे.

### भाऊबंदकी आमने- सामने

या निवडणुकीत विद्यमान संचालक कल्याण पाटील आशीर्वाद पॅनलतर्फे उमेदवारी करीत आहेत. तर त्यांचे ज्येष्ठ बंधू व माजी संचालक प्रवीण पाटील यांच्या पत्नी सौ. लीनाताई पाटील यांनी अपक्ष उमेदवारी करून आव्हान उभे केले आहे. त्याच वेळी विद्यमान संचालक योगेश मुंदडे यांनी आशीर्वाद पॅनलतर्फे उमेदवारी केली आहे. तर त्यांचे सख्खे चुलत बंधू पंकज मुंदडे यांनी अपक्ष उमेदवारी करून एल्गार पुकारला आहे. निवडणुकीतील या भाऊबंदकीतीलच आमने- सामने राजकीय द्वंद्वाची चांगलीच चर्चा आहे.

**निवडणूक रिंगणातील उमेदवार**

अध्यक्षपदासाठी सात उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. यात अक्षय नंदकिशोर अग्रवाल, विनोद जगदीश अग्रवाल, विजय जगन्नाथ बोरसे, डॉ. रवींद्र काशिनाथ कुळकर्णी, राकेश गिरधरलाल माहेश्वरी, लालचंद हेमनदास सैनानी व विक्रम बिपिन शहा यांचा समावेश आहे. उपाध्यक्षपदासाठी तीन उमेदवार रिंगणात आहेत. यात कमल आसकरण कोचर, श्रीमती माधुरीताई प्रमोद पाटील, सचिन बुधा पाटील यांचा समावेश आहे.

विश्वस्तपदासाठी दोन उमेदवार रिंगणात आहेत. यात सौ. वसुंधराताई दशरथ लांडगे, पुरूषोत्तम वसंत शेटे यांचा समावेश आहे. कार्यकारी मंडळ संचालकपदासाठी १७ उमेदवार रिंगणात आहेत. यात नीरज दिपचंद्र अग्रवाल, निशांत राजेंद्र अग्रवाल, प्रदीप कुंदनलाल अग्रवाल, डॉ. संदेश बिपिन गुजराथी, दिलीप हरकचंद जैन, जितेंद्र मोहनलाल जैन, प्रवीण रामलाल जैन, डॉ. अविनाश रघुराज जोशी, पंकज गोविंद मुंदडे, योगेश मधुसुदन मुंदडे, कल्याण साहेबराव पाटील, सौ. लीनाताई प्रवीण पाटील, संतोष बाबूराव पाटील, प्रसाद रमेशचंद्र शर्मा, डॉ. अनिल नथ्थू शिंदे, हरी भिका वाणी व जितेंद्र शांतिलाल झाबक यांचा समावेश आहे. दरम्यान, निवडणुकीत आशीर्वाद पॅनल व परिवर्तन पॅनलमध्ये लढत होत आहे. यात अपक्ष उमेदवारांनीही आव्हान उभे केले आहे.


# विकासामुळे मतदारांचा आम्हालाच 'आशीर्वाद'
## आशीर्वाद पॅनलच्या उमेदवारांचा पत्रकार परिषदेत दावा!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : गेल्या अनेक वर्षांपासून आम्ही खानदेश शिक्षण मंडळाच्या शैक्षणिक प्रगतीचा आलेख उंचावत ठेवला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना परवागी न जाता येथेच शिक्षण मिळावे, यासाठी नवनवीन शैक्षणिक द्वारे खुली करून दिली आहेत. त्यामुळे खानदेश शिक्षण मंडळाच्या त्रैवार्षिक निवडणुकीत आशीर्वाद पॅनलला मतदारांचा चांगला पाठिंबा मिळाला आहे, असा दावा आशीर्वाद पॅनलच्या उमेदवारांनी पत्रकार परिषदेत केला.

खा. शी. मंडळासाठी रविवार, दि. ४ जानेवारी रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या पार्श्वभुमीवर शनिवार, दि. ३ जानेवारी रोजी दुपारी आशीर्वाद पॅनलने जितेंद्र जैन यांच्या कार्यालयात पत्रकार परिषद झाली. याप्रसंगी आशीर्वाद पॅनलचे संचालकपदाचे उमेदवार डॉ. संदेश गुजराथी, योगेश मुंदडे, सीए नीरज अग्रवाल, प्रदीप अग्रवाल, हरी भिका वाणी, कल्याण पाटील, जितेंद्र जैन व डॉ. अनिल शिंदे उपस्थित होते. यावेळी आशीर्वाद पॅनलच्या उमेदवारांनी खा. शि. मंडळाच्या आतापर्यंतच्या झालेल्या विविध विकासकामांच्या प्रगतीचा आढावा मांडला. आगामी काळातही आमच्या विविध योजना आहेत. त्यामुळे आम्हास मतदारांचा आशीर्वाद लाभेल, याची आम्हास खात्री आहे, अशी माहिती आशीर्वाद पॅनलच्या उमेदवारांनी दिली. योगेश मुंदडे यांनी आभार मानले.



"आशीर्वाद पॅनलमध्ये सर्व समाजाच्या घटकांना प्राधान्य दिले आहे. खा. शि. मंडळाची आम्ही खूप प्रगती केली आहे. त्यामुळे मतदार आम्हाला भरघोस मतदानरुपी आशीर्वाद देऊन इतिहास घडवतील. खा. शि. मंडळाच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटीबद्ध आहोत. आमचे आठही उमेदवार जास्तीत जास्त मतांनी विजयी होतील, याची मला खात्री आहे.

**- डॉ. संदेश गुजराथी.**



"सन २०१८ पासून आजतागायत खानदेश शिक्षण मंडळाची जी विकासकामे झाली आहेत, त्या विकासकामांची आम्ही विकास पुस्तिका तयार केली आहे. ही पुस्तिका आम्ही आशीर्वाद पॅनलच्या माध्यमातून प्रचारादरम्यान सभासदांपर्यंत पोहोचवली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी नजिकच्या तालुक्यात जावे लागत होते. मात्र, हे शिक्षण आता आम्ही येथेच उपलब्ध करून दिले आहे.

**- सीए नीरज अग्रवाल.**



"आशीर्वाद पॅनलमध्ये आठही उमेदवार विविध विषयांचे तज्ञ आहेत. याचा फायदा आम्हाला खा. शि. मंडळाच्या विकासासाठी होतो. आम्ही सर्व निर्णय एकोप्याने घेत असतो. गेल्या सात वर्षात खा. शि. मंडळाच्या माध्यमातून नवीन व सुसज्ज शैक्षणिक इमारती आम्ही उभ्या केल्या आहेत. प्रताप पॅटर्न सुरू केला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ झाली आहे.

**- डॉ. अनिल शिंदे.**



**अमळनेर : पाड्यावरचा चहा या उपक्रमांतर्गत स्वयंपाक करताना विद्यार्थी.**

# साने गुरुजी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घेतली 'पाड्यावरचा चहा'ची अनुभूती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : साने गुरुजी नूतन माध्यमिक विद्यालयातील स्काऊट विभाग व मराठी भाषामंडळातर्फे 'पाड्यावरचा चहा' हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. आठवीच्या मराठी पाठ्यपुस्तकातील 'पाड्यावरचा चहा' या पाठावर आधारित प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष निसर्गाच्या सानिध्यात याची अनुभूती घेतली. या उपक्रमात तंबू उभारणी, निसर्गनिवास, तंबू सजावट व स्वयंपाककलेचे कौशल्य आत्मसात करता यावे, या उद्देशाने हा उपक्रम घेण्यात आला. बुधवार, दि. ३१ डिसेंबर रोजी आयोजित या उपक्रमात आठवीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी स्वतः तंबू उभारून त्यांची आकर्षक सजावट केली. तंबू परिसरात सुंदर रांगोळ्या काढण्यात आल्या. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांनी स्वतः भाकरी तयार केल्या. भाजी, ठेचा व भरीत बनवून 'पाड्यावरचा चहा' तयार केला त्याचा आस्वाद घेतला. या उपक्रमाला भारत स्काऊटचे जळगाव जिल्हा संघटक वैशाली अवथले, संस्थेचे सचिव संदीप घोरपडे, मुख्याध्यापक सुनील पाटील, मुख्याध्यापक संजीव पाटील यांनी भेट दिली. त्यांनी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या पदार्थांचा आस्वाद घेत उपक्रमाचे विशेष कौतुक केले. शाळा म्हणजे केवळ चार भिंतींतील पुस्तकी शिक्षण नाही. जीवनातील विविध अनुभवांची शाळा असावी, या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा, श्रमाचा व सहकार्याचा अनुभव मिळाला. सरपण गोळा करून भाकरी टाकताना विद्यार्थ्यांमध्ये मोठी चैतन्यपूर्ण लगबग दिसून आली. खमंग ठेचा, भाकरी व चहा सर्वांना वाटताना मुलांमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळाला. स्काऊट शिक्षक, मराठी शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेऊन विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन केले.










जागतिक ब्रेल दिन विशेष


# समान संधी व सर्वसमावेशकतेकडे एक पाऊल


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दरवर्षी ४ जानेवारी रोजी जागतिक ब्रेल दिन साजरा केला जातो. हा दिवस अशा लोकांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे जे दृष्टिहीन किंवा अंशतः दृष्टिबाधित आहेत आणि त्यांच्या जीवनात ब्रेल लिपीचा असामान्य वाटा आहे.

### ब्रेल दिनाची कारणे आणि इतिहास

या दिवसाची निवड खास लुई ब्रेल यांच्या जन्मदिनी (४ जानेवारी १८०९) आधारित आहे. ब्रेल यांनी त्यांच्या वयाच्या लहान अवस्थेतच एक अतिशय प्रभावी व स्पर्शाने वाचता येण्याजोगी लिपी तयार केली, जी आज जगभरातील दृष्टिबाधित लोकांसाठी वाचन, लेखन व आत्मनिर्भरतेचा पाया बनली आहे. संयुक्त राष्ट्र महासभेने नोव्हेंबर २०१८ मध्ये अधिकृतपणे ४ जानेवारीला जागतिक ब्रेल दिन म्हणून घोषित केले आणि २०१९ पासून हा जागतिक स्तरावर साजरा केला जातो.





### ब्रेल लिपीचे महत्त्व

ब्रेल लिपी केवळ एक वाचन-वाचन प्रणाली नसून ती स्वातंत्र्य, आत्मविश्वास, शिक्षण व रोजगाराच्या संधींचा मार्ग आहे. यामुळे दृष्टिबाधित व्यक्तींना सामान्य व्यक्तींप्रमाणे पुस्तके, अभ्यासक्रम, माहिती व सामाजिक संवादाचा भाग होण्याची संधी मिळते. या लिपीमध्ये सहा उभारलेल्या बिंदूंच्या संयोजनेद्वारे अक्षरे, संख्या, गणितीय चिन्हे आणि अगदी संगीताच्या नोटेशनसुद्धा वाचता व लिहिता येतात.

### आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय स्तरावरील उद्दिष्टे

जागतिक ब्रेल दिनाचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे ब्रेलबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि ब्रेल शिक्षण व प्रमाणित संसाधनांची उपलब्धता सुनिश्चित करणे. आजही अनेक देशांमध्ये ब्रेल शिक्षण, प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता, ब्रेल मशीन व साधनांची कमी उपलब्धता यांसारख्या आव्हानांचा सामना करावा लागतो. संयुक्त राष्ट्राच्या दिव्यांग अधिकारांचा अधिकार आणि माराक्केश करार यांसारख्या आंतरराष्ट्रीय दस्तऐवजांमध्ये ब्रेलसारख्या सुलभ स्वरूपात माहिती उपलब्ध करून देण्याचे अधिकार स्पष्टपणे मान्य करण्यात आले आहेत. परंतु अमलात आणणे ही एक चालू आव्हानात्मक प्रक्रिया आहे.

### भारतातील दृश्य आणि पुढील वाटचाल

भारतात दृष्टिबाधितांच्या संख्या लाखोंमध्ये आहे आणि सरकारने त्यांचे अधिकार व सक्षमीकरण सुनिश्चित करण्यासाठी विविध योजना राबवण्यास सुरुवात केली आहे. ब्रेल लिपीद्वारे शिक्षण, रोजगार आणि माहितीपर्यंत सहज पोहोच देणे ही एक महत्त्वपूर्ण बाब ठरली आहे. राष्ट्रीय आणि स्थानिक स्तरावर विविध संस्था, शाळा आणि समाजसेवी संघटना ब्रेल कार्यशाळा, माहिती सत्रे, लघु कार्यक्रम व शिक्षक प्रशिक्षणांचे आयोजन करतात. ज्यामुळे दृष्टिबाधितांना अधिकाधिक सशक्त बनविण्याचा प्रयत्न केला जातो.

### सामाजिक समावेशन आणि भविष्यातील दिशा

जागतिक ब्रेल दिन हे केवळ एक दिवस साजरा करण्याचे औचित्य नाही ते मानवी हक्क, माहितीपर्याप्तता आणि समावेशकतेची आठवण आहे. आजच्या माहिती-आधारित जगात ब्रेलसारख्या साधनांच्या माध्यमातून दृष्टिबाधित व्यक्तींना पूर्ण सहभागाची संधी देणे आवश्यक आहे. भविष्यात डिजिटल तंत्रज्ञान आणि नवीन साधनांचा समावेश करून ब्रेल अधिक सुलभ व आकर्षक बनविण्याची आवश्यकता आहे. जगभरातील सरकार, शिक्षण संस्था आणि सर्वसामान्य नागरिकांनी ब्रेलच्या महत्त्वाला व जीवनावश्यकतेला ओळख देणं आणि त्यासाठी सक्रियपणे काम करणं हा आपला नैतिक कर्तव्य आहे.

# संगीतातील आरडीएक्स
## आर. डी. बर्मन

स्मृतिदिन विशेष...



आर. डी. बर्मन (राहुल देव बर्मन) हे हिंदी चित्रपटसृष्टीतील एक महान आणि क्रांतिकारी संगीतकार होते. ज्यांनी भारतीय संगीतात पाश्चिमात्य संगीताचा अनोखा मिलाफ घडवला. त्यांना 'पंचम' या नावाने ओळखले जाते. सचिनदा हे 'पंचम' यांचे वडील सचिन देव बर्मन. 'पंचम' यांचा रविवार, दि. ४ जानेवारी रोजी स्मृतिदिन. त्यानिमित्त...

कोलकत्यात लहानाचे मोठे झालेल्या पंचम यांना अभ्यासात कधीच रस नव्हता. त्यांचा दिवस सायकल चालवणे, पोहणे, मित्रांसोबत भटकणे यातच संपत असे. हा मुलगा तर फारच उनाड झाला आहे. मोठेपणी तो काय करणार ही काळजी सतत सचिनदांना असायची. पण पंचम यांनी कुठेही न शिकता माऊथ ऑर्गनवर प्रभुत्व मिळवले होते, ही एक जमेची बाजू होती.

सचिनदांचा त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला, तो पंचम यांच्या शाळेतील बक्षीस समारंभामुळे. या कार्यक्रमात सचिनदांच्या प्रमुख उपस्थितीत पंचम यांनी व्यासपीठावरून सफाईदारपणे माऊथ ऑर्गन वाजवून दाखवला. दुसऱ्या दिवशी सचिनदांनी त्यांना विचारले, 'पुढे काय करायचे ठरवले आहेस?' यावर 'मला तुमच्यापेक्षा मोठा संगीतकार व्हायचे आहे.' हे पंचम यांचे उत्तर त्यांच्यासाठी अनपेक्षित होते. या प्रसंगानंतर त्यांनी त्याला प्रथम ब्रजेन विश्वास, पं. सामता प्रसाद यांच्याकडे तबला व पुढे उस्ताद अली अकबर खान यांच्याकडे सरोद शिकण्यासाठी पाठवले.

वयाच्या १६ व्या वर्षी मुंबईत दाखल झालेले पंचम लगेच वडिलांचा सहाय्यक म्हणून काम करू लागले. त्या वयात त्यांनी स्वरबद्ध केलेल्या 'ए मेरी टोपी पलटके जा' (फंटूश) व 'सर जो तेरा चकराए' (प्यासा) या चालींचा सचिनदांनी चित्रपटांमध्ये उपयोग केला. सचिनदांचा भर लोकगीतांवर, तर पंचम यांना कोणताही संगीत प्रकार वर्ज्य नव्हता.

'आराधना' (१९६९)च्या गाण्यांच्या निर्मितीत पंचम यांचा सिंहाचा वाटा असूनही जेव्हा त्या गाण्यांच्या तबकड्यांचे अनावरण सचिनदांच्या निवासस्थानी झाले तेव्हा पंचम यांचे कोणीही कौतुक केले नाही. पूर्ण कार्यक्रम होईस्तोवर ते एका कोपऱ्यात उभे होते. स्वतंत्रपणे संगीत देण्याची हीच वेळ आहे, या निर्णयाप्रत तेव्हा ते आले होते.

१९६० ते १९९० च्या काळात पंचम यांनी जवळजवळ ३३१ चित्रपटांना संगीत दिले. त्यात सर्वाधिक हिंदी चित्रपटांचा समावेश आहे. त्यातील १८ चित्रपटांत गाणी देखील म्हटली. गायकांमध्ये सगळ्यात जास्त आशाजी व मोहम्मद रफी यांच्यासोबत व त्यानंतर लताजी व किशोरदांसोबत आर.डी. यांनी संगीतसाथ केली. नेक्स्ट जनरेशनचा विचार करणारे व नवीन वाद्य घेऊन विविध प्रयोग करणारे हे संगीतकार होते. आजही भारतातच नव्हे, तर प्रदेशात देखील त्यांची गाणी गुणगुणली जातात. त्यांच्या गीतांचे कार्यक्रम देखील केले जातात. भारतीय शास्त्रीय संगीत, लोकसंगीत व पाश्चात्य संगीताचे अद्‌भुत मिश्रण त्यांनी त्यांच्या गीतांमध्ये केले. त्यात ऊर्जा रोमान्स व प्रयोगशीलता होती.

कारकीर्द अशी बहरत असताना पंचम यांच्या वैवाहिक जीवनात मात्र पानगळ सुरू होती. प्रथम पत्नी रिटा पटेल यांच्याशी झालेला प्रेमविवाह (१९६५) त्यांना लाभला नाही. काही कारणास्तव ते दोघे १९६९ पासून वेगळे राहू लागले. शेवटी १९७३ मध्ये त्यांचा घटस्फोट झाला.
ओ. पी. नय्यर सोबतचे नाते संपल्यानंतर आशा भोसले आणि पंचम जवळ आले. पंचम यांनी आशा भोसलेंसोबत नव्याने संसार मांडला. ते वर्ष होते ७ जुलै १९८०. पंचम यांच्या सांताक्रूझच्या निवासस्थानी हा लग्नसोहळा पार पडला. संपूर्ण मंगेशकर कुटुंब यावेळी हजर होते. तर पंचम यांचे प्रतिनिधी होते किशोर कुमार, बादल भट्टाचार्य व सहाय्यक संपन चक्रवर्ती. पंचम यांच्या आई मीरादेवी (बंगाली गीतकार) या मनोविकारग्रस्त असल्याने त्यांना या लग्नाची कल्पना नव्हती. यानंतर पंचम व आशादीदी देखील एका छताखाली फार काळ राहिले नाहीत. यानंतर पंचम एकांतवासात गेले.

हा एकाकीपणा व्यवसायात देखील निर्माण झाला. स्पर्धेत टिकण्यासाठी करावे लागणारे छक्के-पंजे त्यांना ठावूक नव्हते. १९८० च्या दशकात स्पर्धा वाढल्यानंतर पंचम यांनी मानधन कमी केले. वाटेल ते चित्रपट तो स्वीकारू लागला. यातील अनेक चित्रपटांत चांगल्या गाण्यांना वावच नव्हता. हे कमी म्हणून मी काय त्याचा सूरही हरवला, तो खास करून १९८५ नंतर. १९८० ते ८५ या कालावधीत त्याचे तब्बल १०४ चित्रपट आले. मात्र त्यातील केवळ १४ चित्रपट हीट झाले. सर्वांत वाईट गोष्ट म्हणजे यातील सलग २३ चित्रपट कोसळले. पंचम यांच्यावर 'अनलकी'चा शिक्का बसला. '१९४२ ए लव स्टोरी'मुळे मात्र चित्रपटसृष्टीला त्याचे वेगळेपण जाणवले. परंतु तोवर उशीर झाला होता. पुरस्कार मिळविण्यासाठी करावी लागणारी मोर्चेबांधणीही त्यांना कधीच जमली नाही. मात्र तीनवेळा आर.डीं.ना फिल्मफेअर पुरस्कार मिळाले. तब्बल १६ वेळा सर्वश्रेष्ठ संगीतकार म्हणून नामांकन मिळाले होते. १९७३ मध्ये 'बंगाल फिल्म पत्रकार संघ' हा पुरस्कार देऊन पंचम यांना सन्मानित करण्यात आले. तसेच २०१३ ला पोस्टाच्या तिकिटावर त्यांचे चित्र छापून गौरविण्यात आले होते. या त्यांच्या यशात बासू चक्रवर्ती, मनोहरी सिंग, मारुतीराव कीर, केरसी लॉर्ड, भूपेंद्र व उत्तम सिंग या सहकाऱ्यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांनी हिंदी चित्रपट संगीताला एक नवा आयाम दिला. तरुणाईची गरज ओळखून झिंग आणणारे संगीत दिले. पण सलग चित्रपट कोसळणे, अनपेक्षित पदरी आलेले अपयश, आशा भोसलेंचे दूर जाणे त्यामुळे आलेले एकाकीपण या प्रचंड वैफल्यग्रस्त अवस्थेत ४ जानेवारी १९९४ ला वयाच्या अवघ्या ५४ व्या वर्षी हार्ट अटॅकने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनावर प्रसिद्ध कवी, गीतकार साहिर लुधियानवी यांनी भावना व्यक्त करताना म्हटले- 'वो न आयेंगे पलटकर, उन्हे लाख बुलाए...!'

**- शरद आ. सोनवणे**
**मो. : 94201 08305**

# खोट्या गुन्ह्यांच्या बेड्या तोडून तो झाला डीएसपी
## आईच्या हातावरील 'ती' शपथ आणि बदलले आयुष्य

सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एखाद्या तरुणाला उद्ध्वस्त करण्यासाठी जेव्हा संपूर्ण जग एकत्र येते तेव्हा त्याच्याकडे दोनच पर्याय उरतात. एक तर गुडघे टेकणे किंवा परिस्थितीचे दात घशात घालून नवी ओळख निर्माण करणे. या जिद्दी तरुणाने दुसरा पर्याय निवडला. ज्या हातांना एकेकाळी खोट्या गुन्ह्यांच्या बेड्या ठोकल्या गेल्या आज त्याच हातांमध्ये पोलीस उपअधीक्षक (डीएसपी) पदाची जबाबदारी आली आहे. हातामध्ये बेड्या पडल्या असतानाही ज्याने डोळ्यातील स्वप्न मरू दिले नाही, अशा एका जिद्दी तरुणाची ही गोष्ट आहे.

### आयुष्याचा झाला होता थरारपट

या तरुणाची ही कहाणी एखाद्या मोठ्या बॉलिवूड चित्रपटाच्या कथेपेक्षा कमी नाही. गरिबी, कुटुंबावर झालेला बहिष्कार, हक्काच्या जमिनीवर झालेला कब्जा आणि वारंवार होणारे जीवघेणे हल्ले अशा अनेक संकटांनी त्याला घेरले होते. इतकेच नाही तर राजकारण आणि कोर्टाच्या फेऱ्यांमुळे संपूर्ण कुटुंब विखुरले गेले होते. आई-वडील हॉस्पिटलमध्ये मृत्यूशी झुंज देत होते आणि घर जळून खाक झाले होते. अशा परिस्थितीत या तरुणाने हार मानण्याऐवजी लढण्याचा निर्णय घेतला.

### आईच्या हातावरील 'ती' शपथ

आयुष्यात अनेक वेळा संधी चालून आली होती. २०१५ मध्ये पोलीस कॉन्स्टेबल भरती आणि २०१७ मध्ये सब इन्स्पेक्टर परीक्षेत यश मिळवूनही केवळ नशिबाने आणि षडयंत्राने संधी हुकली. फिजिकल परीक्षेच्या दोन दिवस आधीच मुद्दामहून वाद घालून त्याला अडवण्यात आले. २०१९ मध्ये शिक्षक म्हणून निवड झाली, पण त्याने जॉईन केले नाही.

खऱ्या संघर्षाला सुरुवात झाली एप्रिल २०२० मध्ये. त्याच्या आई-वडिलांवर जीवघेणा हल्ला झाला, घर जाळण्यात आले आणि त्यांच्यावरच खोटे गुन्हे दाखल करून तुरुंगात पाठवण्यात आले. ८ जानेवारी २०२१ रोजी हा तरुण जेव्हा तुरुंगातून बाहेर आला, तेव्हा त्याचे सर्व कुटुंब आतच होते. जून २०२१ मध्ये तर त्याच्या संपूर्ण कुटुंबाचा अपघात घडवून आणण्यात आला. रुग्णालयात रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या आईची अवस्था पाहून तो पूर्णपणे तुटला होता. पण त्याच वेळी त्याने आईची हात हातात घेतली आणि त्यावर एक शपथ लिहिली. त्याने वचन दिले, की, मी पूर्ण मेहनत करेन आणि आता थेट अधिकारी बनूनच परत येईन.

### भिंडचा वाघ आणि स्वप्नांची भरारी

हा तरुण दुसरा कोणी नसून मध्यप्रदेशातील भिंड जिल्ह्यातील डोंगरपुरा गावातील जैनेंद्र कुमार निगम आहे. जैनेंद्रचे वडील स्वतः एमपीपीएससी परीक्षेच्या मुख्य फेरीपर्यंत पाच वेळा पोहोचले होते. पण खोट्या गुन्ह्यांमुळे त्यांचे स्वप्न अपूर्ण राहिले. वडिलांचे तेच स्वप्न उराशी बाळगून जैनेंद्रने अभ्यास सुरू ठेवला. जैनेंद्र जेव्हा इंदूरमध्ये अभ्यास करत होता, तेव्हा त्याच्यावर पुन्हा एकदा हत्येच्या प्रयत्नाचा (कलम ३०७) खोटा गुन्हा दाखल झाला. मात्र, तो त्या वेळी हॉस्टेलमध्ये असल्याचे सीसीटीव्ही फुटेजमुळे सिद्ध झाले. एमपीपीएससी २०२३ च्या मुख्य परीक्षेवेळी त्याला मलेरिया आणि टायफॉइड झाला होता, तरीही अंगात ड्रिप लावून तो पेपर लिहायला बसला.


### निकाल लागला आणि डोळे पाणावले

अखेर त्याच्या कष्टाला फळ मिळाले. एमपीपीएससी २०२३ चा निकाल जाहीर झाला आणि जैनेंद्र कुमार निगम यांची निवड थेट डीएसपी पदावर झाली. ज्या हातांना बेड्या ठोकून गुन्हेगार ठरवण्याचा प्रयत्न झाला, आज त्याच हातांना सलामी देण्याची वेळ आली आहे. ज्या वडिलांचे स्वप्न अपुरे राहिले होते, त्यांचा मुलगा आता राज्याचा पोलीस उपअधीक्षक झाला आहे. ही बातमी जेव्हा जैनेंद्रने वडिलांना सांगितली, तेव्हा त्यांच्या डोळ्यांतून वाहणारे अश्रू हे केवळ आनंदाचे नव्हते, तर अनेक वर्षांच्या अन्यायावर मिळालेल्या विजयाचे होते.



वैज्ञानिकांचे बालपण

# लॉर्ड सर आयझॅक न्यूटन



मुलांनो, तुम्हालाही प्रश्न विचारायला आवडतात का?
हो असेल, तर छानच! कारण प्रश्न विचारणे हीच ज्ञानाची पहिली पायरी आहे. चला तर आज आपण अशाच एका सतत प्रश्न विचारणाऱ्या मुलाबद्दल जाणून घेऊया. जो पुढे जाऊन जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ झाला. आपण आजूबाजूला घडणाऱ्या अनेक गोष्टी सहज पाहतो आणि पुढे निघून जातो. झाडावरून फळ पडते, चेंडू उंच फेकला की खाली येतो, पाऊस नेहमी खालीच पडतो. या गोष्टी इतक्या सामान्य वाटतात की त्यावर कोणी विशेष विचारही करत नाही. पण जग बदलणारे शास्त्रज्ञ मात्र या सामान्य गोष्टींमधून असामान्य प्रश्न शोधतात. असेच प्रश्न विचारणारे एक मूल पुढे जाऊन महान शास्त्रज्ञ झाले. त्यांचे नाव होते लॉर्ड सर आयझॅक न्यूटन. न्यूटन यांचा जन्म इंग्लंडमधील वूल्सथॉर्प या छोट्या गावात झाला. ते खूपच अशक्त जन्मले होते, की त्यांच्या जीवंत राहण्याबद्दल लोकांना शंका होती. त्यांच्या जन्माआधीच वडिलांचे निधन झाले होते. आईवरच घराची संपूर्ण जबाबदारी होती. त्यामुळे न्यूटन यांचे बालपण खेळण्यात, आनंदात, लाडात मुळीच गेले नाही, तर शांतता आणि एकटेपणात गेले. पण हाच एकटेपणा त्यांच्या विचारांना नवी दिशा देणारा ठरला. इतर मुले शेतात खेळत असताना न्यूटन मात्र झाडाखाली बसून पक्ष्यांकडे पाहत, वाऱ्याचा वेग जाणून घेण्याचा प्रयत्न करत असे किंवा पाण्याच्या प्रवाहाकडे तासन्‌तास बघत असे. त्यांना गोष्टी फक्त दिसायच्या नाहीत, तर त्या का घडतात हे शोधायचे असे. ते नेहमी छोटे, छोटे प्रयोग करायचे, साध्या वस्तूंमधून खेळणी तयार करायचे आणि स्वतःलाच प्रश्न विचारायचे. शाळेत न्यूटन फारसे बोलके नव्हते म्हणून शिक्षकांनाही ते साधारणच वाटत असे. पण एखादी गोष्ट समजून घेताना ते ती पूर्णपणे समजल्याशिवाय थांबत नसत. हळूहळू त्यांना गणित आणि विज्ञानाची त्यांना गोडी लागली. पुढे शिक्षणासाठी ते केंब्रिज विद्यापीठात गेले. त्या काळात एक मोठा आजार पसरल्यामुळे विद्यापीठ काही काळ बंद झाले. न्यूटन गावाकडे परतले. त्यांच्या शिक्षणात अडथळा आला, पण प्रत्यक्षात हा काळ त्यांच्या आयुष्यातील सर्वांत महत्त्वाचा ठरला. शांत वातावरणात, निसर्गाच्या सान्निध्यात त्यांनी खोल विचार सुरू केले.

एक दिवस ते झाडाखाली बसले असताना झाडावरून एक सफरचंद खाली पडले. ही घटना साधी होती, पण न्यूटन यांच्या मनात मोठा प्रश्न निर्माण झाला"हे सफरचंद खालीच का पडले? ते हवेत का थांबले नाही? वर का गेले नाही?"या प्रश्नातून त्यांनी असा निष्कर्ष काढला की पृथ्वी प्रत्येक वस्तूला स्वतःकडे ओढते. या शक्तीला त्यांनी गुरुत्वाकर्षण असे नाव दिले. ही शक्ती फक्त सफरचंदापुरती मर्यादित नाही, तर माणसांना जमिनीवर ठेवते, समुद्रांना त्यांच्या जागी रोखते आणि चंद्राला पृथ्वीभोवती फिरायला भाग पाडते. सूर्याच्या गुरुत्वाकर्षणामुळेच पृथ्वी सूर्याभोवती फिरते, हेही त्यांनी दाखवून दिले.

न्यूटन यांनी वस्तूंच्या हालचालींचे नियमही मांडले. एखादी वस्तू स्थिर का राहते, कधी आणि कशी हालते, यामागे ठराविक नियम असतात, हे त्यांनी सिद्ध केले. आज आपण गाडी चालवतो, झोका घेतो, उडी मारतो तेव्हा नकळत न्यूटन यांचे नियमच काम करत असतात. प्रकाशाबद्दलही त्यांना खूप कुतूहल होते. प्रयोगातून त्यांनी दाखवून दिले, की पांढरा प्रकाश एका रंगाचा नसून सात रंगांनी बनलेला आहे. आकाशात दिसणारे इंद्रधनुष्य याचेच सुंदर उदाहरण आहे. ताऱ्यांचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी स्वतःची दुर्बीण तयार केली. त्या काळात हे फार मोठे यश होते. इतके महान शोध लावूनही न्यूटन अतिशय साधे जीवन जगत होते. त्यांना प्रसिद्धीची हाव नव्हती. ज्ञान मिळविणे आणि ते इतरांना देणे हेच त्यांचे ध्येय होते. त्यांच्या कार्याची दखल घेऊन इंग्लंडच्या राणीने त्यांना ' सर ' ही पदवी दिली. तरीही ते कायम नम्र राहिले. मुलांनो, सर आयझॅक न्यूटन यांचे आयुष्य आपल्याला एक सुंदर शिकवण देते. मोठे शास्त्रज्ञ होण्यासाठी जादूची कांडी लागत नाही. आजूबाजूच्या गोष्टी लक्षपूर्वक पाहणे, चिकित्सक विचार करणे आणि उत्तर शोधण्याचा प्रयत्न करणे हेच खरे विज्ञान आहे. झाडावरून पडणाऱ्या एका साध्या सफरचंदातूनही संपूर्ण विश्वाचे रहस्य उलगडू शकते, हे न्यूटन यांच्या आयुष्याने आपल्याला शिकविले.

मुलांनो, या नवीन वर्षापासून आपणही न्यूटनसारखा चिकित्सक विचार करायला सुरूवात करूया, चालेल ना?

**- मंगल नागरे- देशमुख**
**जि. प. शाळा, कलाली (ता. अमळनेर)**

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# संपूर्ण जगात २०२६ वर्ष सुरू; 'या' देशात अजूनही सुरु आहे वर्ष २०१८



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वर्ष २०२५ संपले आहे. संपूर्ण जगात आता २०२६ वर्ष सुरु झाले आहे. मात्र, जगात असा एक देश आहे जेथे अजूनही २०१८ वर्ष सुरु आहे. हा देश जगाच्या इतर भागांपेक्षा फक्त एक वर्षाने नाही, तर सात ते आठ वर्षे मागे आहे. इथिओपिया देशात टाईम मशीन बदलली आहे.

इथिओपिया पूर्व आफ्रिकेत स्थित एक अद्वितीय राष्ट्र. या देशात फक्त वर्ष नाही तर अनेक जगावेगळ्या गोष्टी आहेत. संपूर्ण जगात १२ महिन्यांचे कॅलेंडर आहे. इथिओपिया हा एकमेव देश आहे जिथे १३ महिन्यांचे कॅलेंडर आहे. प्रत्येक महिना ३० तारखेला संपतो. मात्र, शेवटचा महिना फक्त ५ ते ६ दिवसांचा असतो. वर्षाच्या शेवटच्या महिन्याला पॅगुमे म्हणतात. खंडांमध्ये वेळेचा फरक असला, तरी आशियापासून युरोपपर्यंत सर्व खंडांमध्ये २०२६ हे वर्ष सारखेच आहे. मात्र, इथिओपियामध्ये सध्या २०१८ हे वर्ष आहे. याचे मुख्य कारण इथिओपियाने ग्रेगोरियन कॅलेंडरचे पालन करण्यास नकार दिला आहे. म्हणूनच हा देश जगाच्या इतर भागांपेक्षा ७ ते ८ वर्षे मागे आहे. त्याची मुळे इतिहास, धर्म आणि कॅलेंडर प्रणालींमध्ये आहेत. इथिओपिया हा जगातील काही मोजक्या देशांपैकी एक आहे जो अजूनही स्वतःचे पारंपारिक कॅलेंडर पाळतो.
१५८२ मध्ये युरोपने ग्रेगोरियन कॅलेंडर अंतर्गत लीप वर्ष आणि तारखेच्या सुधारणा सुरू केल्या. मात्र, इथिओपियाने या सुधारणा स्वीकारल्या नाहीत आणि जुन्या कॅलेंडर गणना चालू ठेवल्या.
इथिओपिया हा आफ्रिकेतील एक अद्वितीय आणि ऐतिहासिक देश आहे, ज्याची संस्कृती, कॅलेंडर आणि धार्मिक महत्त्व जगाच्या इतर भागांपेक्षा पूर्णपणे वेगळे आहे. जवळजवळ सर्व आफ्रिकन देश युरोपने गुलाम बनवले होते. मात्र, इथिओपिया हा एकमेव आफ्रिकन देश आहे, जो कधीही वसाहत बनला नाही. त्याच्या अद्वितीय संस्कृती आणि भाषांसाठी प्रसिद्ध आहे.
चौथ्या शतकात इथिओपिया हा ख्रिश्चन धर्म स्वीकारणाऱ्या पहिल्या देशांपैकी एक होता.
इथिओपियन ऑर्थोडॉक्स चर्च हे जगातील सर्वात जुन्या चर्चपैकी एक मानले जाते. प्राचीन धार्मिक ग्रंथ, चर्च आणि परंपरा आजही अबाधित आहेत.
या देशात ६७ टक्के ख्रिश्चन आहेत. प्राचीन काळात हा देश ख्रिश्चन संस्कृतीचे केंद्र देखील होता. युरोप आणि जगभरात वापरला जाणारा ग्रेगोरियन कॅलेंडर १ इसवी सनात येशूच्या जन्मापासून सुरू होतो. इथिओपियन कॅलेंडरचे विद्वान ऐतिहासिक गणनेवर आधारित येशूचा जन्म ७ ते ८ वर्षांनंतर करतात. कॉफीचा शोध इथिओपियामध्ये लागला.
"कॉफी" हा शब्द काफा प्रदेशात उगम पावला असे मानले जाते.
इथिओपियन कॉफी जगातील सर्वात प्रसिद्ध कॉफींपैकी एक मानली जाते.

## ख्वाजा नगरात हाणामारी; चौघांवर गुन्हा दाखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील ख्वाजा नगर भागात किरकोळ वादातून हाणामारी झाली आहे. याप्रकरणी शनिवार, दि. ३ जानेवारी रोजी येथील पोलीस ठाण्यात चौघांवर गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत फरजाना जाफर बेलदार यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे, की शुक्रवार, दि. २ जानेवारी रोजी सकाळी घराच्या बांधकामासाठी मी पाणी मारत होते. यावेळी शेजारील महिलेच्या अंगावर पाणी उडाले. या रागातून त्यांनी मला शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. माझे पती कामाहून परतल्यावर त्यांना जाब विचारण्यास गेले. त्यावेळी शकिलोद्दीन मुजावर, जाकीरोद्दीन मुजावर, सोईलोद्दीन शकीलोद्दीन मुजावर व शोएब शकिलोद्दीन मुजावर यांनी माझ्या पतीस मारहाण करून गंभीर दुखापत केली. याप्रकरणी हवालदार अशोक साळुंखे, विजय भोई तपास करीत आहेत.

# यापुढे शाळांना ग्लोबल, इंटरनॅशनल शब्द वापरण्यास मनाई

## शिक्षण विभाग तपासणार शाळांची संलग्नता; सीबीएसई आणि इंग्लिश मीडियमही प्रतिबंधित

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्यातील अनेक खासगी शाळांनी पात्रता, संलग्नतेचे निकष पूर्ण केले नसतानाही आपल्या नावात 'ग्लोबल', 'इंटरनॅशनल', 'सीबीएसई', 'इंग्लिश मीडियम' अशी नावे लावली आहेत. ही कृती बेकायदेशीर असल्याचे स्पष्ट करत त्यांच्या नावात बदल करण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. राज्यस्तरीय प्राधिकरणाच्या सचिवांच्या निर्देशानुसार अशा शाळांची मान्यता नेमकी कोणत्या शिक्षण मंडळाची आहे, याची तपासणी केली जाणार आहे. तसेच शाळांची नावे बदलण्याबाबत शाळा व्यवस्थापनाला सूचना करून कार्यवाही होणार आहे. नव्याने येणाऱ्या प्रस्तावातील नावाबाबत खातरजमा करूनच तो प्रस्ताव राज्य प्राधिकरणाकडे पाठविला जाणार आहे. शिक्षण विभागाच्या प्राधिकरणाकडे नावांबाबत येणाऱ्या राज्य अनेक प्रस्तावांमध्ये शाळांची नावे, माध्यम व मंडळ संलग्नता यामध्ये तफावत आढळून येत आहे. काही शाळा राज्य मंडळाशी संलग्न असताना त्यांच्या नावात 'इंटरनॅशनल', 'ग्लोबल', 'सीबीएसई' अशा शब्दांचा वापर करण्यात येत असल्याचे स्पष्ट झाले आहे. 'ग्लोबल', 'इंटरनॅशनल' नावाचा वापर पूर्वी शहरातच इंग्रजीच्या शाळा होत्या. मात्र, खेडेगावातही इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू होऊन, 'ग्लोबल', 'इंटरनॅशनल', 'सीबीएसई' या शब्दांचा वापर या शाळा संस्थांकडून केला जात आहे.



विद्यार्थी आणि पालकांची दिशाभूल एखाद्या गावात किंवा शहरात 'इंटरनॅशनल' किंवा 'ग्लोबल' शब्द पाहिल्यावर पालकांना ती दर्जेदार असल्याचे जाणवते. मात्र, प्रत्यक्षात परिस्थिती वेगळीच असते. या शाळांच्या नावामध्ये 'इंटरनॅशनल', 'ग्लोबल', 'सीबीएसई', 'इंग्लिश मीडियम' अशा शब्दांचा वापर केला जात असल्याने एकप्रकारे समाज, पालक, शासन आणि विद्यार्थ्यांची दिशाभूल होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे अशा शाळा प्रशासनाला शासनाकडून चपराक लावली जाणार आहे.

नियमांचे उल्लंघन केल्यास शासनाकडून कारवाई...

शाळांच्या नावांमध्ये दिशाभूल करणारे शब्द आढळल्यास, संबंधित शाळा व्यवस्थापनास नाव बदलण्यास सांगितले जाणार आहे. जर शाळा प्रशासनाने ऐकले नाही, तर कारवाई केली जाणार आहे. यामुळे नव्याने मान्यता मागणाऱ्या किंवा दर्जावाढीसाठी प्रस्ताव सादर करणाऱ्या शाळांची तपासणी होणार आहे. शाळांची नावे, माध्यम अन् संलग्नतेत तफावत शिक्षण संचालनालयाच्या अंतर्गत राज्य प्राधिकरणाकडे प्राप्त होणाऱ्या प्रकरणांबाबत शाळांच्या नावांमध्ये मोठ्या प्रमाणात तफावत दिसून आली आहे. त्यांच्या नावामध्ये 'इंटरनॅशनल', 'ग्लोबल', 'सीबीएसई', 'इंग्लिश मीडियम' अशा प्रकारच्या शब्दांचा उपयोग केलेला आहे; परंतु सदर शाळांची मान्यता मराठी माध्यम असल्याची स्थिती आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली. काय आहे शासन नियम 'सीबीएसई' हा शब्द केवळ केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या अधिकृत शाळांसाठीच वापरणे कायदेशीरदृष्ट्या ग्राह्य असल्याने, राज्य मंडळाच्या शाळांनी तो नावात वापरणे योग्य नसल्याचे संचालनालयाने स्पष्ट केले आहे. तसेच, 'इंटरनॅशनल' किंवा 'ग्लोबल' असे शब्द वापरण्यासाठी संबंधित शाळेची परदेशातील शाखा किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील अधिकृत संलग्नता असणे आवश्यक आहे. मात्र, अनेक शाळांकडे अशी कोणतीही पात्रता नसतानाही हे शब्द वापरले जात असल्याचे आढळले. यापुढे शाळा मान्यतेसाठी नव्याने येणाऱ्या प्रकरणांची तपासणी करताना शाळेचे नाव, त्यांचे मंडळ व माध्यम, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील संस्थांच्या मान्यतेची खात्री केली जाणार आहे.

राज्य शिक्षण मंडळाची मान्यता असलेल्या शाळांना इंटरनॅशनल ग्लोबल, सीबीएसई, इग्लिश मीडियम अशा फॅन्सी शब्दांचा आता वापर करता येणार नाही.



*अमळनेर : विजयनाना पाटील आर्मी स्कूलमध्ये सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त उपस्थित सांस्कृतिक विभागप्रमुख शरद पाटील, प्राचार्य बी. डी. पाटील, सुभेदार मेजर श्रीराम पाटील व शिक्षिका आदी.*

# सावित्रीबाई फुलेंचे विचार जिवंत ठेवावे

## शरद पाटील : विजयनाना पाटील आर्मी स्कूलमध्ये अभिवादन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर सावित्रीबाई फुले यांनी महिला शिक्षणासाठी केलेले काम अतिशय उच्च दर्जाचे आहे. आजच्या काळात त्यांच्या शैक्षणिक विचारांना जिवंत ठेवण्याची गरज आहे, असे प्रतिपादन सांस्कृतिक विभागाचे उपाध्यक्ष शरद पाटील यांनी केले.

विजयनाना पाटील आर्मी स्कूल अँड ज्युनियर कॉलेजमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती व "बालिका दिन" प्रसंगी ते बोलत होते. प्राचार्य बी. डी. पाटील अध्यक्षस्थानी होते. सुभेदार मेजर श्रीराम पाटील व महिला शिक्षिका व्यासपीठावर उपस्थित होत्या.

शरद पाटील यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा प्रेरणादायी जीवनपट उपस्थितितांसमोर मांडला. नाभिकांचा संप, बालहत्या प्रतिबंध गृह, महिला पुनर्विवाह साठी केलेले प्रयत्न, पुण्यातील प्लेगच्या साथीच्या वेळेस केलेले कार्य आदींबाबत माहिती दिली. सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सातवीचा विद्यार्थी गिरीश पाटील व आठवीचा विद्यार्थी भूमीत धनगर यांनी मनोगत व्यक्त केले. शिक्षिका लता पवार यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकून बालिका दिनानिमित्त सुंदर गीत सादर केले. प्राचार्य पाटील यांनी मार्गदर्शन केले. गणित शिक्षक शिवाजी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. उपशिक्षक भूषण साळुंखे यांनी आभार मानले.



*अमळनेर : म. वा. मंडळात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करताना डॉ. यु. जी. देशपांडे, बन्सीलाल भागवत, डॉ. महेश पाटील, डॉ. विजय तुंटे आदी.*

## म. वा. मंडळात अभिवादन

अमळनेर : येथिल मराठी वाड्मय मंडळात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. यु. जी. देशपांडे, बन्सीलाल भागवत, डॉ. महेश पाटील, डॉ. विजय तुंटे, सुभाष पाटील, विश्वास देशमुख, किरण पाटील, रमाकांत शिंदे, हेमंत बाळापुरे, जगदीश कुळकर्णी आदी उपस्थित होते.

# लोकसंस्कृती ओळख जपणारी जिवंत परंपरा

## डॉ. मधुचंद्र भुसारे : प्रताप महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




*अमळनेर : प्रताप महाविद्यालयात मराठी भाषा पंधरवड्यानिमित्त " खानदेशातील लोकसंस्कृतीचे महत्त्व " या विषयावर बोलताना डॉ. मधुचंद्र भुसारे. व्यासपीठावर डॉ. ज्ञानेश्वर कांबळे, डॉ. विलास गावीत, प्रा. तुषार पाटील, प्रा. सागर सैंदाणे, प्रा. गोपाल बडगुजर, डॉ. ज्ञानसागर सूर्यवंशी आदी.*

अमळनेर : लोकसंस्कृती ही केवळ भूतकाळाची स्मृती नाही. ती समाजाची सांस्कृतिक ओळख जपणारी जिवंत परंपरा आहे, असे प्रतिपादन केले. चोपडा येथील साहित्यिक तथा संशोधक डॉ. मधुचंद्र भुसारे यांनी केले.

येथील खानदेश शिक्षण मंडळ संचलित प्रताप महाविद्यालय आणि उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त " खानदेशातील लोकसंस्कृतीचे महत्त्व " या विषयावर ते बोलत होते. मराठी विभागप्रमुख डॉ. ज्ञानेश्वर कांबळे, डॉ. विलास गावीत, प्रा. तुषार पाटील, प्रा. सागर सैंदाणे, प्रा. गोपाल बडगुजर, डॉ. ज्ञानसागर सूर्यवंशी तसेच महाविद्यालयातील विविध विद्याशाखांचे विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. भुसारे पुढे म्हणाले, की खानदेशातील लोककला, लोकगीते, लोकपरंपरा, सण-उत्सव, बोलीभाषा आणि ग्रामीण जीवनशैलीची ओळख करून घेणे गरजेचे आहे. आधुनिकतेच्या प्रवाहात लोकसंस्कृतीचे जतन व संवर्धन करणे ही आजच्या पिढीची जबाबदारी आहे. डॉ. कांबळे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. गोपाल बडगुजर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. ज्ञानसागर सूर्यवंशी यांनी आभार मानले.

# खान्देश साहित्य संघाच्या तालुकाध्यक्षपदी सुनीता पाटील

## तालुका सचिवपदी गोपाल हडपे यांची नियुक्ती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



सुनीता पाटील गोपाल हडपे

अमळनेर : खान्देश साहित्य संघाच्या अमळनेर तालुकाध्यक्षपदी कवियत्री तथा जिल्हा आदर्श शिक्षिका पुरस्कारप्राप्त सौ. सुनीता रत्नाकर पाटील, तर तालुका सचिवपदी माध्यमिक शिक्षक गोपाल पोपट हडपे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. खान्देश साहित्य संघाचे केंद्रीय अध्यक्ष प्रा. डॉ. सदाशिव सूर्यवंशी, जिल्हाध्यक्ष शरद धनगर, जिल्हा सचिव उमेश काटे यांच्या स्वाक्षरीने पत्र देऊन या नूतन पदाधिकाऱ्यांची तीन वर्षाकरिता नियुक्ती देण्यात आली आहे. तालुका काय-कारीणी अशी : कार्याध्यक्ष- दत्तात्रय बारकु सोनवणे, उपाध्यक्ष- शरद भिका पाटील, प्रतिभा रामचंद्र पाटील, सहसचिव- रूपाली अरुण पाटील, ज्येष्ठ मार्गदर्शक- गोरख दगडू पाटील, राजेंद्र भिकन वाघ, कार्यवाह- नूतन हिंमत पाटील, कार्यवाह-अशोक रघुनाथ पाटील, ज्येष्ठ महिला मार्गदर्शक- छाया अशोक इसे, अनिता दीपक बोरसे, महिला संघटक- रेखा वाल्मिक मराठे, भारती यशवंत शिंदे, पुरुष संघटक- चंद्रकांत भिला पाटील, विशाल सोपानराव देशमुख तर सदस्यपदी पूनम जगतराव साळुंखे, जयश्री दिलीप पवार, मंगल विठ्ठल नागरे, रवींद्र सुकदेव पाटील, अनिल नथ्थु पाटील, विलास गोविंदा बिरारी, मनोज चिंतामण ठाकरे यांचा समावेश आहे. नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडीबद्दल मराठी वाङ्मय मंडळ, पूज्य साने गुरुजी मोफत वाचनालय व ग्रंथालय, शिवशाही फाउंडेशन, साने गुरुजी शैक्षणिक विचार मंच, 'मसाप' अमळनेर शाखेच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# उद्योगातून शिक्षण, शिक्षणातून प्रेरणा; विद्यार्थ्यांचा एमआयडीसी अभ्यास दौरा



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील मंगरूळ येथील (स्व.) आबासो अनिल अंबर पाटील माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी औद्योगिक वसाहतीत अभ्यास दौरा झाला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी औद्योगिक वसाहतीबाबत सर्व माहिती जाणून घेतली.

विद्यार्थ्यांना लघुउद्योग, व्यवसाय प्रशिक्षण मिळावे तसेच विविध उत्पादनाची माहिती प्राप्त व्हावी या उद्देशाने विद्यार्थ्यांचा हा अभ्यास दौरा झाला. यावेळी विद्यार्थ्यांनी गंगा फूड्स येथे धान्य पॉलीश, आटा फॅक्टरी येथे गव्हापासून सुजी, रवा, पीठ, मैदा कसे तयार होतात. तसेच पाईप फॅक्टरी, पाण्याच्या टाकीच्या कंपनीत पाईप आणि टाक्या कशा तयार होतात. शुद्ध पाणी तयार होऊन ते बाटल्यांमध्ये कसे भरतात, पुठ्ठ्याचे खोके कसे तयार करतात, चप्पलचे सोल कसे तयार करतात आदी उद्योगांची माहिती जाणून घेतली. दिलीप डेरे, नीलेश भांडारकर, जितेंद्र चंद्रात्रे यांनी मार्गदर्शन केले. अभ्यास दौऱ्यात मुख्याध्यापक प्रकाश पाटील, प्रभुदास पाटील, संजय पाटील, राजेंद्र पाटील, सुषमा सोनवणे, शीतल चव्हाण, सीमा मोरे, सीमा पाटील, प्रवीण पाटील, मनोज पाटील, सुदर्शन पवार, खुशाल पाटील, प्रदीप पाटील यांचे सहकार्य लाभले. उद्योजकांकडून विद्यार्थ्याना मोफत अल्पोपहार देण्यात आला. या औद्योगिक क्षेत्र भेटीमुळे पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना व्यवसाय, लघु उद्योगाची प्रेरणा मिळाली. मालाची ने- आण, विक्री, वाहतूक कशी करतात, बाजारपेठ कशी उपलब्ध होते, नफा- तोटा याबाबत ज्ञान अवगत झाले.











अमळनेर : शाकंभरी पौर्णिमेनिमित्त शनिवारी मंगळेश्वरी श्री भूमीमाता मंदिरात विविध भाज्यांची केलेली आकर्षक सजावट.

# पुसा रविवार म्हणजे काय? काय आहे कहाणी?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

पुसा रविवार म्हणजे पौष महिन्यातील रविवारी केली जाणारी सूर्यदेवाची पूजा (पौष रविवार व्रत). जी आरोग्य, सुख-समृद्धी आणि संकटांपासून संरक्षणासाठी केली जाते. यामध्ये सूर्यदेवाला तांब्याच्या भांड्यातून पाणी अर्पण करणे, लाल चंदन वापरणे, मंत्र म्हणणे आणि सूर्यदेवाची कथा वाचणे यासारख्या विधींचा समावेश असतो. विशेषतः पौष महिन्यात हा दिवस महत्त्वाचा मानला जातो.

यासंदर्भातील गोष्ट अशी, की दिवसभर तसे राजाच्या कानी कोंबड्याने घातलेला उधम पडलेलाच होता. मावळतीच्या किरणांनी न्हावून निघालेल्या राजवाड्याच्या गच्चीवर शिपायांची वाट बघत असलेला राजाची भुवई रित्या हाती परतलेल्या शिपायांना बघून उंचावली. महाराज, थ्ये कोंबडे साधेसुधे न्हाई, सारा दिवस मागे लागूनबी न्हाई गवसले... शिपायांच्या म्होरक्याने काय घडले ते सारे राजाला कथन केले.

आता गावातच नव्हे तर अख्ख्या राज्यात वार्ता पसरली. एका कोंबड्याने राजाच्या नाकीनऊ आणल्याची बातमी तशी नवलाचीच होती. वस्त्या-वस्त्यांत, झाडांच्या पारांवर, नद्यांच्या तीरांवर कोंबड्याची नवलाई चर्चिली जाऊ लागली वेशी-वेशीतून पसरू लागली. कुणाला बोलणाऱ्या कोंबड्याचे आश्चर्य वाटत होते, तर कुणी कोंबड्यामागे लागलेल्या राजाला नावे ठेवत होते. तसा राजा आधी चवताळला अन् मग पस्तावला. लहानांशी टेच केली की कधी-कधी मोठ्यांचे मोठेपणच धोक्यात येते, हे त्याला आता पुरेपूर उमगले. पण आता उशीर झाला होता.

'हा तिढा सोडवायचा कसा?' हेच त्याला उमगेना इकडे कोंबड्याचे राजकन्येला डिवचणे सुरूच होते. राजाची इभ्रत पणाला लागली होती. शेवटी राजाने प्रधानाला बोलावणे धाडले. इतर गोष्टीतील प्रधानांसारखा याही गोष्टीतील प्रधान शहाणा होता. त्याने उपाय सुचविला, 'महाराज, कोंबडा नवलाचा खरा पण बळाने हाती लागणे कठीणच, जरा युक्तीने काम करावे लागेल. 'त्या कुणा म्हातारीने त्याला लेक मानलाय अन् हाही तिच्या शब्दाबाहेर नाही, असे कानावर आले. तेव्हा आधी त्या म्हातारीशी संपर्क साधायला हवा.' झाले! राजाने म्हातारीला समोर हजर करण्याचा फतवा काढला अन् शिपायांचे सज्ज झालेले दळ प्रधानाने रोखले. 'महाराज आता बळाने नाही, सबुरीने घ्यायचे आपल्याला.'

'मग काय करू म्हणता प्रधानजी?' आता राजा नरमला होता. 'महाराज, आपणच जाऊ तेथे.' प्रधानाने सल्ला दिला. 'कुठे? त्या कोंबड्याच्या म्हातारीकडे...?' 'अं हं! कुक्कुटेश्वरांच्या मातोश्रींकडे!' परिस्थिती बघून वागायचे कसब प्रधानजी चांगलेच जाणत होते. शाही इतमामात राजा आणि प्रधानाच्या जोडीने म्हातारीच्या झोपडीची वाट धरली अन् वार्ता कर्णोपकर्णी झाली. मग एकाच्या साथीला दुसरा असे करत कामधंदा नसलेले रिकामटेकडे त्यांच्यामागे जात राहिले. बघता-बघता भला मोठा जुलूसच म्हातारीच्या फाटकाशी उभा ठाकला. म्हातारी गांगावली. अख्ख्या आयुष्यात कुणाच्या खिजगणतीत नसलेल्या म्हातारीच्या दाराशी साक्षात् रथावर स्वार झालेला राजा उभा होता. नित्याप्रमाणे अंगणातल्या भाजीपाल्याची निगा राखत असलेल्या म्हातारीला 'काय करू? कसे करू?' हेच उमगेना. ती खुळावल्यागत तशीच उभी राहिली.

'आजीबाई, महाराजांना आपली भेट घ्यायची होती.' प्रधानजींनी बाजू सांभाळून घेतली. कसेबसे भानावर आलेल्या म्हातारीने राजाला प्रधानासंग आत घेतले. काही क्षण सारेच मुके होते. फाटकाबाहेर ही गर्दी जमली होती.

'आजीबाई, आपला लेक दिसत नाही कुठे?' जराशाने प्रधानजींनी विषयाला हात घातला.

'असेल इकडेच दाणे टिपत.' गांगावलेली म्हातारी आता सावरली होती. मुकाट्याने तिने गुळाचे खडे अन् पाण्याचे तांबे दोघांसमोर ठेवले.

'आजीबाई, कुक्कुटेश्वर म्हणजे आमच्या राज्याची नवलाई. त्यांना आणखी सुखात ठेवावे म्हणतोय आम्ही.' आता राजाने साखरपेरणी सुरू केली अन् म्हातारी सावध झाली.

गेल्या काही दिवसांतील घडामोडी तिला चिंतेत पाडत होत्याच. कोंबड्याच्या आगाऊपणाने धास्तावलेली म्हातारी आणखीनच सावध झाली होती. आताही कोंबड्याचा कुक्कुटेश्वर झालेला बघून नव्या संकटाची चाहूल तिला लागलीच. पण समोर राज्याचा स्वामी बसला होता. त्याला विरोध करणे बरे नव्हे, याचे भान होते तिला. मग ती मुक्यानेच अदमास घेत राहिली.

'आमच्या राजवाड्यात, आमच्या महाली चांगली बडदास्त राखतो त्यांची...'

'माह्या कोंबड्याला माझ्यापासून दूर न्हाई होऊ देणार मी.' राजाचे बोलणे पुरे व्हायच्या आत म्हातारी तडतडली.

'तुम्हीही चला सोबत.' प्रधानजींनी उपाय सुचविला.

'नका भरीस पाडू! सारी जिंदगी या माळरानवर निवडुंगासारखी एकटीनेच या झाडा-वेलीसंग घालवली, हेच माझ्या सुखा-दुःखातील सगेसोयरे झाले. नशिबाने कोंबडा सोबतीला आला अन् उजाड कूस फळल्यागत वाटले. आता हेच माझे जग, त्यातच मला सुख वाटते.' म्हातारीच्या मुखातून अंतरीचे बोल बाहेर पडले अन् विषयच खुंटला. हारल्या मनाने तेथून परतताना राजाच्या मुखातून जणू विष बाहेर पडले. 'दैव देते आणि कर्म नेते. म्हातारीची जिद्द म्हणजे एक भिकाऱ्याच्या ओकाऱ्या!'

राजाच्या शब्दांनी दुखावलेली म्हातारी विचारती झाली, 'राजा, माझा लेक धाडला नाही तुझ्यासंग तर इथे विष ओकून चाललास.

अरे, जसे माझे कष्टाचे जिणे तुला परके तसे तुझे वैभव मला नवखे. दासी-कुळंबिणींच्या राबत्यात, भालदार-चोपदारांच्या धाकात चिंबून जाईल माझा लेक. तू तरी धाडशील तुझा काळजाचा तुकडा माझ्याकडे?'

म्हातारीच्या तोंडून तिची माया बोलत होती. पण राजाच्या अहंकाराला ठेच लागली होती.

**(टीप : बालपणी आजींकडून ऐकलेली ही गोष्ट आहे. त्यातून कुठलेही उद्बोधन वगैरे काहीही नाही, तर केवळ मनोरंजन हाच याचा हेतू आहे.)**



# खंडोबा : शौर्य, पराक्रम आणि भक्तांच्या रक्षणाचे प्रतीक

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

खंडोबा हे दैवत महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातील लोकदैवत आहेत. त्यांना 'मल्हारी मार्तंड', 'येळकोट' या नावांनीही ओळखले जाते. खंडोबा देवता हे शौर्य, पराक्रम आणि भक्तांच्या रक्षणाचे प्रतीक मानले जातात. त्यांच्या पूजेमध्ये नैवेद्याला विशेष महत्त्व आहे. भक्त आपल्या श्रद्धेनुसार आणि परंपरेनुसार त्यांना विविध नैवेद्य अर्पण करतात.

## १) भाकरी

खंडोबा देवाला ज्वारीची किंवा बाजरीची भाकरी अतिशय प्रिय आहे. ग्रामीण भागात खंडोबाच्या पूजेत भाकरीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. भाकरी ही साधेपणा, कष्टकरी जीवन आणि भूमीशी जोडलेपणाचे प्रतीक मानली जाते.

## २) कांदा

कच्चा कांदा हा खंडोबा देवाचा खास नैवद्य समजला जातो. कांदा भाकरीसोबत अर्पण करण्याची प्रथा अनेक ठिकाणी आहे. काही ठिकाणी कांद्याची भाजी किंवा ठेचा देखील नैवद्य म्हणून दिला जातो.

## ३) ठेचा

हिरव्या मिरचीचा किंवा कांद्याचा ठेचा खंडोबाच्या नैवद्यामध्ये हमखास असतो. ठेचा हा तिखट आणि झणझणीत असल्यामुळे खंडोबा देवाच्या उग्र स्वरूपाशी जोडला जातो.

## ४) पुरणपोळी

सणासुदीच्या दिवशी, विशेषतः चंपाषष्ठी आणि जत्रेच्या काळात खंडोबाला पुरणपोळी अर्पण केली जाते. पुरणपोळी ही गोड नैवेद्याचे प्रतीक आहे.

## ५) मसाले भात

खंडोबा देवाच्या नैवद्यामध्ये मसाले भात हा देखील महत्त्वाचा पदार्थ आहे. विशेषतः सामूहिक पूजांमध्ये मसाले भात, भाजी आणि भाकरी असा नैवेद्य दिला जातो.

## ६) दही, तूप आणि लोणी

काही ठिकाणी खंडोबाला दही, तूप किंवा लोणी अर्पण केले जाते. हे पदार्थ सात्त्विक नैवेद्यामध्ये मोडतात.

## ७) खोबरे आणि प्रसाद

पूजेमध्ये नारळ फोडणे, खोबरे अर्पण करणे आणि त्याचा प्रसाद वाटणे ही सर्वसाधारण प्रथा आहे.

## ८) वांगी भाजी

काही भागात वांग्याची भाजी किंवा भाजी-भाकरीचा नैवेद्य दिला जातो.

## ९) नैवेद्याचे महत्त्व

खंडोबा देवाला नैवद्य अर्पण करताना पदार्थांपेक्षा भक्ती, श्रद्धा आणि मनाची शुद्धता अधिक महत्त्वाची मानली जाते. साधा नैवेद्य दिला तरी भक्तीभावाने दिल्यास देव प्रसन्न होतो अशी श्रद्धा आहे.

## मना सज्जना...

# 'श्रेष्ठ धारिष्ट ठेवा'



परम स्नेही मित्रहो,
आपण समर्थांच्या ७ व्या श्लोकाचे मनन, चिंतन करूया...

**मना 'श्रेष्ठ धारिष्ट' जिवि धरावे ।**
**मना बोलणे 'नीच' सोसीत जावे ।**
**स्वये सर्वदा 'नम्र' वाचे वदावे ।**
**मना सर्व लोकांसि रे ' निववावे' ॥ ७ ॥**

या श्लोकातील प्रत्येक चरणातील एकेक शब्द विशिष्ट आहे. त्यांना विशिष्ट संदर्भ आहेत, अर्थ आहेत. हे शब्द अवतरण चिन्ह टाकून वेगळे दर्शविले आहे. या श्लोकातील हे शब्द श्लोकाचा आत्मा म्हटल्यास वावगे होणार नाही. समर्थांची शब्दकळा त्यांच्या अर्थाने समजून घ्यावी लागते. 'आघाते उच्च धारिष्ट उपजे' असे म्हटले जाते.

याचा अर्थ आशय थोडक्यात म्हणजे आघातांनी, संकटांनी, वेदनांनी, अपमानाच्या प्रसंगी गुणी व्यक्तीच्या अंगी येणारे बळ हे उच्च धैर्याचे असते. असे धारिष्ट संकटाप्रसंगी साधकाच्या अंगात येते. त्याला कारण त्याचा आत्मविश्वास. श्रेष्ठ म्हणजे उच्च प्रतीचे. आपले आयुष्य सरळरेषेत चालणारे नसते. ते आकस्मिक, अपयशांनी, फसवणुकींनी, दुःखांनी भरलेले असते. आयुष्यात ताणतणाव असतात ते आपली परीक्षा पाहतात. आपल्या संस्कृतीत आध्यात्मिक, आधिभौतिक, आधिदैविक ताप सांगितले आहेत.

हे ' ताप ' म्हणजे केवळ शारीरिक ताप नव्हे, तर मनुष्याच्या जीवनात दुःख, क्लेष व अस्वस्थता निर्माण करणाऱ्या सर्व वेदना. या वेदना तीन प्रमुख प्रकारांत विभागल्या आहेत. म्हणून त्यांना त्रिविध ताप असे म्हणतात.

### १) आध्यात्मिक ताप

हा ताप स्वतःच्या शरीरातून, मनातून उत्पन्न होतो. शारीरिक व्याधी, आजार, रोग, वेदना यांनी व्यक्ती बाधित होते. मनाचे विकार, राग, लोभ, मोह, मत्सर, भीती, चिंता, आत्मग्लानी, असमाधान, अस्थिरता यातून आणि मनावर नियंत्रण नसल्याने, विवेक कमी झाल्याने हा ताप वाढतो.

### २) आधिभौतिक ताप

हा ताप आपल्या आजूबाजूच्या परिसराचा त्यातील सजीव व भौतिक घटकांपासून होतो. समाजातील घटकांपासून होणारा अन्याय, अपमान, संघर्ष तसेच प्राणी, कीटक, सर्पदंश इत्यादी अपघात, दारिद्र्य, सामाजिक ताण वगैरे.

### ३) आधिदैविक ताप

हा ताप दैवी किंवा नैसर्गिक शक्तींमुळे होतो. दुष्काळ, पूर, भूकंप, वादळ, अतिवृष्टी, अनावृष्टी, महामारी, हवामानातील असंतुलन या आपल्या आवाक्याबाहेर असलेल्या शक्तींमुळे निर्माण होणारा ताप.

प्रत्येक मनुष्याचे जीवन हे या तिन्ही तापांनी वेढलेले आहे. यापासून कुणीही सुटलेले नाही. या तिन्ही तापांचे शमन विवेक, वैराग्य, सदाचार व भक्ती यांच्या सहाय्याने तसेच करुणा, संयम व सहअस्तित्वाने श्रद्धा ठेवल्याने होते. हे ताप सहन करण्याची शक्ती व्यक्तीने उच्च धारिष्ट अंगी ठेवले की येते.

**मना बोलणे नीच सोशित जावे...**

यातील 'नीच' या शब्दाचा अर्थ हा 'हलक्या प्रतीचे' असा घ्यावा. आयुष्यात बऱ्याचदा प्रसंगी अपशब्द ऐकावे लागतात. टीका ऐकावी लागते. अपमान होतो. त्याने आपल्या मनाला विलक्षण वेदना होतात. तत्काळ प्रत्युत्तर द्यावे, असे वाटते. परंतु त्याने आणखीनच वाद वाढतो. संघर्ष होतो. मनाची शांती भंग होते. उद्वेग निर्माण होतो. म्हणून समर्थ बोलणे सोसायला सांगतात. सहन करायला सांगतात. ते विचारपूर्वक. याचा अर्थ वाईट बोलणाऱ्याला त्याच्या बोलण्याचा पश्चाताप व्हावा, त्याला आपली चूक कळावी. समर्थ म्हणतात-

**धके चपेटे सोसावे । नीच शब्द साहत जावे ।**
**प्रस्तावोन परावे । आपले होती ।**

पश्चाताप झालेल्या व्यक्तीला उदार मनाने क्षमा केल्यास ती आपली होते.

समर्थांनी छत्रपती संभाजी राजे यांना पत्रात उपदेशपर लिहिलेले आहे. राज्यकारभार करताना चुकलेल्या व्यक्तींसंदर्भात कसे निर्णय असावेत याबद्दल ते म्हणतात-

**काही उग्रस्थिती सांडावी । काही सौम्यता धरावी ।**
**चिंता लागली परावी । अंतर्यामी ।**
**मागील अपराध क्षमावे । कारभारी हाती धरावे ।**
**सुखी करून सोडावे । कामाकडे ।**

अपराधी व्यक्तीचे महत्त्व ओळखून क्षमा करावी, पुन्हा त्याला पुन्हा स्वराज्य सेवेत सामावून घ्यावे.

**स्वये सर्वदा 'नम्र' वाचे वदावे ।**

सदैव नम्रता धारण करावी. आपल्या बोलाने कुणाचेही अंतःकरण दुखावणार नाही, कुणीही दुरावणार नाही याची काळजी घ्यावी.

**प्रसंग जाणोनी बोलावे । जाणपण काहींच न घ्यावे ।**
**लीनता धरून जावे । जेथ तेथे ।**

प्रसंग ओळखून बोलणे असावे. सारे काही मलाच समजते, असा भाव कदापिही नसावा. असा आविर्भाव असला, की आपली उपस्थितीही इतरांना सुखावते.

**मना सर्व लोकांसि रे 'निववावे'**

निवणे म्हणजे शांत करणे, असा अर्थ आहे. निवणे हा शब्द आपण पाण्यासंदर्भात वापरतो. तापलेले पाणी निवते म्हणजे गार होते. आपल्या नम्र, मृदू बोलण्याने लोकांना संतोष व्हावा.

समर्थ म्हणतात-

**उंच नीच म्हणू नये ।**
**सकळाचे निववावे हृदय ।**

कुणालाही हेतुपूर्वक वाईट-साईट बोलू नये. केवळ वादविवाद आणि विसंवाद यामुळे माणसे दुरावतात. उत्तम रीतीने माणसे जोडण्याचे साधन म्हणजे मृदू आणि प्रेमाचे बोल, हे विसरता कामा नये.

**जगामध्ये जगमित्र ।**
**जिव्हेपाशी आहे सूत्र ।**

नम्रतेने, मृदू वचनांनी लोकांची अंतःकरणे जिंकावी त्यांची. म्हणजे व्यक्ती लोकप्रिय होऊन दिग्विजय घडतो.

समर्थांना अशा सज्जन, सुसंस्कृत, लीन, नम्र मनाची अपेक्षा आहे. म्हणूनच ते मनाचे प्रबोधन करतात.

**जय जय रघुवीर समर्थ!**

**- भाऊसाहेब देशमुख, अमळनेर.**
**मो. : 94203 89541**

